महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# ( नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मेट्रो स्थानकांवर उपलब्ध दुकानांना व्यावसायिकांचा प्रतिसाद

नागपूर: मेट्रो प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्याकरिता विविध उपाय योजना सातत्याने केल्या जातात. नागपूर मेट्रो प्रकल्पांतर्गत नॉन-फेयर रेव्हेन्यू बॉक्स ची संकल्पना राबलवी जात आहे. या अंतर्गत तिकीट भाड्या शिवाय महसूल मिळवण्यावर भर आहे. या प्रक्रिये अंतर्गत महा मेट्रो तर्फे निविदा सादर केल्या अहोत्या. याला स्थानिक व्यावसायिकांनी प्रतिसाद दिला असून विविध मेट्रो स्थानकांवरील उपलब्ध जागांकरता एकूण १४ जागांकरिता व्यवसायिंकांनी निविदा सादर केल्या आहेत.

महा मेट्रो तर्फे नॉन-फेयर रेव्हेन्यू बॉक्स अंतर्गत संपत्ती विकास, ट्रेन रॅपिंग, मेट्रो स्टेशन को-ब्रॅण्डिंग, स्थानकांवर लावलेल्या स्क्रीनच्या माध्यमाने जाहिरात देणे अश्या विविध पैलूंचा समावेश आहे. रस्ता दुभाजका यादरम्यान जाहिरात फलक लावणे आणि त्या भागाचा रखरखाव सारख्या उपक्रमाचा देखील यात समावेश आहे. या सर्व बाबींसंबंधी माहिती महा

मेट्रोच्या संकेत स्थळावर तसेच मेट्रो भवन येथील प्रॉपर्टी डेव्हलपमेंट विभागातून मिळू शकते. येथून माहिती घेत या विविध सोईंचा लाभ घेता येतो.

महा मेट्रोने प्रवास करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. २६ जुन २०२२ रोजी ६६,४२८ प्रवाश्यांनी मेट्रोने प्रवास केला आणि एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. वाढत्या प्रवासी संख्येमुळे स्थानिक व्यवसायी देखील महा मेट्रोच्या विविध नॉन-फेयर रेव्हेन्यू बॉक्स अंतर्गत असलेल्या सोईंचा लाभ घेण्यास उत्सुक आहेत. नागपूर मेट्रो अंतर्गत छत्रपति चौक, काँग्रेस नगर, सीताबर्डी इंटरचेंज , जीरो माइल फ्रीडम पार्क, लोकमान्य नगर, धरमपेठ कॉलेज, शंकर नगर चौक मेट्रो स्टेशन सारख्या स्थानकांवर व्यवसायाकरिता जागा उपलब्ध आहेत.